पूर्वा
कृषिदूत
प्रबोधनातून परिवर्तन...
मासिक

संस्थापक संपादक
डॉ. बी.बी. पवार

संपादक
डॉ. भास्कर गायकवाड

संपादन सहयोग
पराग वाड

चित्रांकन आणि मांडणी
कैलास भामरे

मुखपृष्ठ
विजय सैंदाणे

व्यवस्थापक - लेखा विभाग
राजेंद्र बागुल

सहकार्य
विजय पवार
संचालक, पूर्वा ॲग्रोटेक

सुहास कदम
संचालक, पूर्वा ॲग्रो मार्केटिंग

महेश पाटील
संचालक, पूर्वा केमटेक, खान्देश

विजय नाईकरे
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, पुणे

सचिन दिघे
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, संगमनेर

रईस इनामदार
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, कोपरगाव

नंदकिशोर चतरकर
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, विदर्भ

संजय पाटील
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, मराठवाडा

■

पूर्वा केमटेक प्रा.लि.,
एम ११३, एमआयडीसी अंबड,
नाशिक-४२२०१०
मो. ७४२००१४७८१
email:poorvakrushidoot@gmail.com

# संपादकीय

## करार शेतीचे मूलतत्त्व

## जशी ग्राहकांची मागणी; तशी पीक-लावणी



डॉ. भास्कर गायकवाड
(संपादक : 'पूर्वा कृषिदूत')
मो. ९८२२५१९२६०
gaikwadbh@yahoo.com

- कृषी क्षेत्राकडे 'व्यापारी' दृष्टिकोनातून बघणे आवश्यक
- बाजारपेठेची गरज ओळखूनच शेतीमाल पिकविला पाहिजे
- करार शेतीचा पर्याय ठरेल कृषी उत्पादकांसाठी लाभदायी
- संयुक्तपणे केलेल्या नियोजनातून शेतकरी सक्षम होतील
- उत्पादनाची गुणवत्ता मात्र जपावी; त्यामध्ये खोट नसावी
- तांत्रिक- वाणिज्य स्तरावर मार्गदर्शन तसेच समन्वय गरजेचा

**जा**गतिक स्तरावरील खुली अर्थव्यवस्था आणि जागतिक कृषी व्यापार यामुळे आज सर्वच क्षेत्रांमध्ये आमूलाग्र बदल झालेला आहे. कृषी क्षेत्राव्यतिरिक्त इतर क्षेत्रांमध्ये बदल करणे तुलनेने सोपे असल्यामुळे त्यामध्ये जागतिक बाजारपेठेचा विचार करून लवकर बदल करण्यात आले. परंतु कृषी क्षेत्रात पाहिजे त्या प्रमाणात बदल झालेले दिसून येत नाहीत.

एक तर भारतासारख्या कृषिप्रधान देशातील ६० टक्के समाज हा शेतीवर अवलंबून आहे. या मोठ्या क्षेत्रात बदल करण्यासाठी योग्य त्या उपाययोजना आणि नियोजन करण्यात आले नाही. तसेच शेती व्यवसाय पूर्णत: निसर्गावर अवलंबून असल्यामुळे केलेले नियोजन अनेकदा कोलमडून पडते. तिसरी महत्त्वाची बाब म्हणजे आजही कृषी क्षेत्राकडे बघण्याचा दृष्टिकोन 'व्यापारी' नाही! जागतिक बाजारपेठेत कोणत्या प्रकारचा बदल होतो ही बाब उत्पादकापर्यंत कधीच पोहचत नाही. इतर क्षेत्रांतील व्यावसायिक जागतिक बाजारपेठेतील बदलानुसार त्यांच्या व्यवसायामध्ये लगेचच बदल करत असतात. जागतिक पातळीवरच्या कृषी क्षेत्रातील बदलांची स्थानिक उत्पादकांना माहिती नसल्यामुळे ते त्यांना माहीत असलेल्याच तंत्रज्ञानाचा आणि पिकांचा अवलंब करतात. काही प्रगतिशील शेतकरी नवीन तंत्रज्ञानाचा

किंवा पिकांचा अवलंब करतात. त्यात काही यशस्वी होतात तर काही अपयशी होतात. यामागील मुख्य कारण म्हणजे उत्पादन काढल्यानंतर ते ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यासाठी अनेक सोपस्कारांमधून जावे लागते. त्यासाठी योग्य सोयी-सुविधांचा अभाव असतो, त्या सोयी-सुविधा शेतकरी स्वत: निर्माण करू शकत नाही. त्यामुळे जागतिक बाजारपेठेच्या गुणवत्तेचे आणि गरजेएवढे उत्पादन असूनही ते योग्य ग्राहकांपर्यंत न पोहोचल्यामुळे शेतकऱ्यांना समाधानकारक बाजारभाव मिळत नाही.

## जशी बाजारपेठेची गरज; तसे नियोजन

कृषी क्षेत्रातील बदलांमध्ये सर्वात महत्त्वाचा बदल आवश्यक आहे आणि तो म्हणजे ग्राहकांच्या मागणीनुसार शेतीमालाचे उत्पादन. आज शेतकरी त्यांना वाटते त्या पिकांचे किंवा आवडेल त्या पिकांचे उत्पादन घेतात. त्यामुळे अनेकदा एकाच पिकाचे जास्त उत्पादन वाढल्यामुळे बाजारभाव कोसळतात तर कधी उत्पादन कमी असल्यामुळे बाजारभाव वाढतात. यामध्ये ग्राहकांची मागणी आणि पिकांचे उत्पादन यांचा फारच कमी मेळ घातलेला असतो. यापुढील काळात अशी शेती पध्दती अडचणीत येऊ शकते. म्हणूनच ग्राहकांच्या मागणीनुसार उत्पादन घेणे, त्यांच्या मागणीनुसार उत्पादनाची प्रत टिकविणे गरजेचे आहे. योग्य प्रकारच्या आणि आकाराच्या पॅकिंगमध्ये शेतीमाल योग्य ठिकाणी योग्य वेळी उपलब्ध करून दिला तर त्याला चांगला बाजारभाव मिळतो. आज काही शेतकरी अशा प्रकारचे उत्पादन घेऊन शेतीमधून चांगले अर्थार्जन करत आहेत. परंतु बाजारपेठेचा अभ्यास करून उत्पादन घेणे हे सर्वच शेतकऱ्यांच्या आवाक्याबाहेर आहे. त्यासाठी शेतकरी वर्ग संघटित होण्याची गरज आहे. कारण असंघटित उत्पादकांचे उत्पादन हे अस्ताव्यस्त पसरलेले आहे. असा माल शेतकऱ्यांकडून एकत्रित करून त्यावर प्रक्रिया करून किंवा आकर्षक पॅकिंग करून योग्य ग्राहकांपर्यंत पोहचविणे अवघड असते. यासाठी शेतकऱ्यांचा समूह, प्रक्रिया- विक्री करणाऱ्या यंत्रणा, बाजारपेठेची माहिती देणारी यंत्रणा आणि विक्री झाल्यानंतर त्याची रक्कम मिळवून देण्यासाठी अर्थपुरवठा करणाऱ्या यंत्रणा या सर्वांनी एकत्रित येण्याची गरज आहे. यासाठी आज विविध यंत्रणा कार्य करत आहेत. सरकारी यंत्रणा, सहकारी संस्था, खासगी संस्था यासाठी पुढे येऊन त्यांनी कंत्राटी शेती पध्दतीला सुरुवात केलेली आहे. त्यामध्ये बीजोत्पादनापासून ते प्रक्रियांपर्यंत सर्व घटकांचा अंतर्भाव केलेला असून निविष्ठा आणि अर्थसहाय्य पुरवठा करणाऱ्या संस्थांनाही त्यामध्ये सहभागी करून घेतलेले आहे. अर्थात त्यामधील फायद्या- तोट्याची, त्यांच्या कायदेशीर बाबींची आणि मुख्यत: उत्पादन आणि त्यांची प्रतवारी यांची सविस्तर माहिती घेऊनच त्यामध्ये सहभागी होणे फार महत्त्वाचे आहे.

## कंत्राटी शेती म्हणजे काय?

कंत्राटी शेती, जिला 'करार शेती' म्हणतात त्यामध्ये ग्राहकांच्या मागणीनुसार उत्पादकांकडून उत्पादन काढून घेण्यासाठी मध्यस्थांनी केलेले कंत्राट किंवा करार अंतर्भूत असतो. यामध्ये सर्वात महत्त्वाची असते ती ग्राहक आणि त्याची पसंती. मागील १५-२० वर्षांपूर्वी पंजाब राज्यामध्ये या कंत्राटी शेतीला सुरुवात झाली. अर्थात त्यापूर्वीही बीजोत्पादन कार्यक्रम हा करार पध्दतीने शेतकऱ्यांकडून करून घेण्यासाठी महाबीज किंवा खासगी बियाणे कंपन्या कार्यरत होत्या. शेतकरी हा ग्राहक डोळ्यासमोर ठेवून बियाण्याचे आवश्यकतेनुसार उत्पादन घेऊन त्यावर योग्य ते संस्करण करून त्याचा पुरवठा केला जातो. या कार्यक्रमामध्येही शेतकरी हा एकटा गृहीत न धरता शेतकऱ्यांच्या गटांना प्राधान्य देण्यात येते तसेच काही सहकारी संस्थांच्या माध्यमातूनही हा कार्यक्रम राबविला जातो. अशा प्रकारे प्रक्रिया करणाऱ्या काही कंपन्या पुढे आल्या.

सुरुवातीला उपलब्ध शेतीमालावर प्रक्रिया करून ते ग्राहकापर्यंत पोहचविण्यात आले. सुरुवातीच्या काळात ते ग्राहकांनी स्वीकारले. परंतु जागतिक बाजारपेठेत विविध देशांच्या मालाबरोबर ग्राहक या मालाचीही तुलना करू लागला. ग्राहक जागरूक असल्यामुळे त्यांनी त्याच्या पसंतीनुसार मागणी सुरु केली. अशा वेळी प्रक्रिया करणाऱ्या कंपन्यांनीही त्यामध्ये बदल केला. बाजारपेठेत उपलब्ध मालावर प्रक्रिया करून तयार होणारा पदार्थ ग्राहक स्वीकारत नाहीत. मग ग्राहकाला पाहिजे तो पदार्थ तयार करण्यासाठी कशा प्रकारचा शेतीमाल तयार केला पाहिजे यावर लक्ष केंद्रित करण्यात आले.

## प्रतवारीनुसार उत्पादनाचे नियोजन

या नियोजनात पक्क्या मालाची प्रत टिकविण्यासाठी कच्च्या मालाची प्रत पाहिजे त्या पध्दतीने उत्पादित करण्यावर भर दिला. जसा पाहिजे त्या प्रतीचा माल तयार करून देतील त्यांचाच माल ते घेण्यास तयार झाले. त्यासाठी जास्त बाजारभाव किंवा हमीभाव देण्याचीही त्यांनी तयारी दर्शविली. तसेच हा उत्पादक विखुरण्याऐवजी एकत्रित येत असेल अशाच ठिकाणी लक्ष केंद्रित केले. शेतीमालाची प्रत योग्य मिळण्यासाठी ठरावीक भागाचीच निवड केली तसेच उत्पादन काढण्यासाठी शेतकऱ्यांना आवश्यक असलेले विशिष्ट प्रकारचे बियाणे, पाहिजे त्या प्रतीचे उत्पादन मिळण्यासाठी योग्य असे पीक उत्पादन तंत्रज्ञान, काढणी, ग्रेडिंग, प्रत तपासणी, पॅकिंग, वाहतूक, साठवणूक यासारख्या सर्व सोयी उपलब्ध करून दिल्या. या सर्व बाबींसाठी मोठी आर्थिक उलाढाल अपेक्षित धरून अर्थपुरवठा करणाऱ्या संस्थांना सहभागी करून घेतले. म्हणजेच ग्राहकांच्या पसंतीला उतरेल असा माल तयार करून त्यांच्यापर्यंत पोहचविण्यासाठी लागणाऱ्या सर्व यंत्रणा एकत्रित करून शेती सुरु केली. यासाठी त्यांनी एकमेकांशी करार केला. म्हणजेच शेतीमधून निघणारा माल शेतकरी कंपनीला देईल. तसेच कंपनीने ठरवून दिलेल्या गुणप्रतीनुसार माल तयार झाला तर ठरवून दिलेल्या किंमतीला कंपनी तो विकत घेईल. उत्पादन घेण्यासाठी लागणारा अर्थपुरवठा आणि केलेला अर्थपुरवठा परत करण्याची हमी कंपनी अर्थपुरवठा करणाऱ्या संस्था तसेच शेतकऱ्यांना देईल. शेतीमालाचे नुकसान झाले तर घेतलेले कर्ज फेडता यावे यासाठी विमा कंपन्याही वाटा उचलत आहेत. अशा पध्दतीने एकाच उद्देशाने सर्वांनी एकत्र येऊन शेतीमधून उत्पादन काढण्यासाठी एकमेकांशी केलेला करार म्हणजेच करार शेती किंवा कंत्राटी शेती. आज अनेक पिकांमध्ये अशा प्रकारची करार शेती सुरु झालेली आहे. कांदा, बटाटा, टोमॅटो, अनेक प्रकारची फळे, सुगंधी तेल उत्पादन, औषधी वनस्पती लागवड, सेंद्रिय शेती उत्पादन, कडधान्य उत्पादन, तेलबिया लागवड, गहू, भात लागवड, कुक्कुटपालन यासारख्या अनेक शेती तसेच शेतीपूरक उत्पादनांसाठी करार शेती पध्दतीला सुरुवात झालेली आहे.

## कंत्राटी शेतीची गरज का जाणवते?

आज भारतासारख्या देशामध्ये भिन्न हवामानात विविध प्रकारचे उत्पादन घेतले जाते. तसेच आपल्या शेतकऱ्यांची जमीनधारणाही कमी आहे. उपलब्ध जमिनीमध्येही शेतकरी एकाच प्रकारचे पीक घेत नाही. एक शेतकरी एक एकरापासून ते ४-५ एकरांपर्यंत एखादे पीक घेतो. त्यामुळे त्या पिकाचे उत्पादन फारच थोड्या प्रमाणात असते. अनेकदा तर शेतकरी शेतीमाल गावाच्या बाहेरही पाठवू शकत नाही. कारण त्याच्याकडील उत्पादनासाठी स्वतंत्र वाहतूक व्यवस्था तो उपलब्ध करू शकत नाही. मुक्त अर्थव्यवस्थेमुळे या शेतकऱ्यांना परदेशी शेतकऱ्यांशी स्पर्धा करावी लागत आहे. प्रगत देशांतील शेतकऱ्यांचा विचार केला तर त्यांची जमीनधारणा खूप मोठी; म्हणजे शेकडो ते हजारो एकर एवढे मोठे क्षेत्र असते. त्यामध्ये एकाच प्रकारचे पीक घेतले जाते. हवामान, जमीन आणि सर्व पीक व्यवस्थापन एकसारख्या प्रकारचे असल्यामुळे शेतीच्या उत्पादनात एकसारखेपणा येतो. त्याने उत्पादन केलेला सर्व माल त्याला विक्री करावयाचा असतो. म्हणजे मुक्त अर्थव्यवस्थेमध्ये स्पर्धा तर आहे; परंतु स्पर्धकांचा विचार केला तर एक मोठा गलेलठ्ठ पहिलवान तर एक काडी पहिलवान! अशा वेळी ही स्पर्धा 'निरोगी' होणार नाही! त्यासाठीच सर्व काडी पहिलवानांची मोळी बांधून त्यांना एकत्र करण्याचे काम करणे गरजेचे आहे.

जागतिक बाजारपेठेयोग्य गुणवत्तेचा शेतीमाल पिकविण्यासाठी काहीतरी यंत्रणा किंवा पध्दतीची आवश्यकता असते. ही सर्व पध्दती आणि उपाययोजना कंत्राटी शेतीच्या माध्यमातून होऊ शकते. त्याचप्रमाणे आपला शेतकरी काढणीपश्चात तंत्रज्ञान आणि विक्री व्यवस्था एकटा करू शकत नाही कारण यासाठी मोठ्या भांडवलाची गरज असते. स्वत:च्या अल्पशा उत्पादनासाठी एकटा शेतकरी एवढ्या मोठ्या प्रमाणात भांडवल उपलब्ध करू शकत नाही. खासगी कंपन्या, सरकारी यंत्रणा किंवा सहकारी संस्था अशा प्रकारच्या शेतीसाठी लागणाऱ्या पायाभूत सोयी सुविधा निर्माण करू शकतात. तसेच बाजारपेठेची सर्व माहिती घेऊन त्यानुसार योग्य ते नियोजनही या संस्था करू शकतात. म्हणूनच भारतासारख्या विखुरलेल्या, विभिन्न हवामानात विविध उत्पादन घेत असलेल्या, अल्पभूधारकांच्या शेतीमालाचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी कंत्राटी शेती आवश्यक आहे. कारण या जागतिक स्पर्धेत आपला शेतकरी टिकला तरच आपली कृषिप्रधान भारतीय संस्कृती टिकणार आहे.

## पारंपरिक धोरणांचा पगडा!

दुसरे महत्त्वाचे म्हणजे आजही शासकीय यंत्रणा म्हणजे संशोधन संस्था, विस्तार करणाऱ्या संस्था तसेच एकूणच कृषी धोरणांचा विचार केला तर त्यावर बाजारपेठेच्या मागणीनुसार बदल हा फारच कमी दिसतो. आजही आमच्या या सर्व यंत्रणा त्यांच्या पारंपरिक पध्दतीच्या कोषातून बाहेर पडण्यास तयार नाहीत. अर्थात त्यांचा उदरनिर्वाह हा शासनाच्या अनुदानावर होत असल्यामुळे त्यांना नवीन जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी उपलब्ध असलेल्या उपाययोजनांची माहिती होत नाही. याउलट खासगी कंपन्यांना स्पर्धेत टिकण्यासाठी मार्केटच्या मागणीनुसार बदल करावा लागतो. त्यासाठी ते पीक, तंत्रज्ञान निर्मिती आणि प्रसार, अर्थपुरवठा, विक्री व्यवस्था, प्रक्रिया, साठवणूक आणि विमा यासारख्या अनेक बाबींवर सतत कार्य करत असतात. एकाच ठिकाणी आपणास अनेक बाबींचा समावेश दिसतो; कारण त्यांचा उद्देश हा व्यापारी असला तरीही ज्यांच्या जिवावर त्यांच्या व्यापाराचा तंबू उभा असतो. असे दोन्हीही स्तंभ म्हणजेच ग्राहक आणि उत्पादक यांच्या मानसिकतेचा, त्यांच्या शाश्वततेचा आणि त्यांच्या भविष्याचा विचार या कंपन्या करतात. कारण त्यातील एखादा स्तंभ डगमगला तरी त्यांचा व्यापार थंडावतो. म्हणूनच कंत्राटी किंवा करार शेती ही ग्राहक, उत्पादक यांच्याबरोबर देशाच्या कृषी अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. अर्थात त्यासाठी योग्य त्या उपाययोजना, योग्य त्या कायदेशीर बाबी यांचा विचार सर्व पातळ्यांवर होणे आवश्यक आहे.

## करार शेतीचे यश-अपयश

कोणत्याही नाण्याला दोन बाजू असतात. करार शेतीच्याही दोन बाजू आहेत. दोन्ही बाजू चांगल्या असल्या तरच आपण नाणे खरे आहे असे म्हणतो. एक बाजू फारच चांगली दिसत असली तर दुसरी बाजूही तपासून घेणे महत्त्वाचे आहे. करार शेती ही जास्तीत जास्त एकमेकांच्या विश्वासावर चालते. शेतकऱ्यांचा पहिला विचार करू. आजही शेतीमालाचा मोंढा लावण्याची आमची सवय जात नाही; वरवर चांगला माल आणि आतमध्ये निकृष्ट माल! आमच्या व्यापाऱ्यांनी आमच्या शेतकऱ्यांची मोंढा लावण्याची सवय चांगली ओळखली आहे. तोही मग बाजारात बरोबर खालचा माल काढून दाखवितो आणि मग तो सांगेल त्या भावाला आपण लाजत लाजत किंवा नाईलाजाने माल देऊन टाकतो! आज जागतिक खुल्या अर्थव्यवस्थेमध्ये भाग घेत असताना आपली ही मोंढा लावण्याची सवय किती घातक आहे याची जाणीव द्राक्ष उत्पादकांना आलेली आहे. मालाचे पैसे तर जाऊ द्या पाठविलेला शेतीमाल नष्ट करण्यासाठी आमच्या द्राक्ष उत्पादकांनी परदेशात पैसे पाठविले आहेत. दुसऱ्यांनी आमच्याबरोबर प्रामाणिक रहावे असे सांगण्याअगोदर आम्ही त्याच्या बरोबर किती प्रामाणिक असतो हे पहिल्यांदा तपासून बघितले पाहिजे. शेतीमधून फक्त पैसाच मिळतो या मानसिकतेपासून थोडे बाजूला जाऊन शेतीमधून प्रतिष्ठा, नाव, अन्नदाता यासारखी विभूषणेही मिळतात, याचीही मनाच्या कोपऱ्यात थोडीशी जाणीव ठेवली तर मग बऱ्याचशा बाबी सोप्या होतील. आजही काही बाजारपेठांमध्ये काही शेतकरी, गट, संस्था किंवा गावाच्या नावावर त्यांचा शेतीमाल चढ्या भावाने विकला जातो आणि तोही पहिल्या झटक्यात. (हेच ते आधुनिक भाषेतले ब्रॅण्डनेम किंवा गुडविल!) दुसरी बाब म्हणजे एका ठरावीक दराप्रमाणे शेतकऱ्यांनी कंपनीबरोबर करार केल्यानंतर जर बाजारभाव वाढले तर शेतकरी तो माल कंपनीला न देता परस्पर मार्केटमध्ये विकून टाकतो. म्हणजेच शेतकऱ्यांनी कंत्राटी शेती पध्दतीकडे वळत असताना या दोन बाबींचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. एका जत्रेने देव म्हातारा होणार नाही असे म्हणतात; तसेच एकदा फसवणूक करता येते परंतु वारंवार फसविणे अवघड जाते, हेही लक्षात ठेवावे.

## करार पद्धती पारदर्शक असावी

करार शेती करून घेणाऱ्या कंपन्यांकडूनही अशीच अपेक्षा आहे. बाजारपेठेत स्वस्त माल उपलब्ध असल्यास शेतकऱ्यांच्या मालाची गुणवत्ता चांगली नाही या नावाखाली काही कंपन्या शेतकऱ्यांचा माल नाकारतात. तसेच त्यांच्या गरजेपेक्षा जास्त माल झाला किंवा ग्राहकांकडून मागणी कमी झाली तरीही ते करार केलेल्या शेतकऱ्यांकडून माल घेण्यास टाळाटाळ करतात. अशा वेळी शेतकरी आणि करार करणारी संस्था यांच्यातील संबंध बिघडतात. अनेकदा मग दुर्दैवाने कायदेशीर कारवाई सुरु होते. आज करार शेतीबाबत योग्य असे कायदे तयार झालेले दिसत नाही. तसेच करार पध्दतीबाबतही काही ठिकाणी पारदर्शकता दिसून येत नाही. अर्थात कायद्यामध्ये अनेक पळवाटा असतात. म्हणूनच कंत्राटी शेती पध्दतीमध्ये एकमेकांवर विश्वास फारच महत्त्वाचा आहे. कारण सर्वांचा उद्देश आणि हेतू एकच असेल तर

एकमेकांना फसविण्यापेक्षा त्यांच्यामध्ये विश्वास निर्माण झाला तर निश्चितच यश मिळते. आज शेतकरी अनेकदा एकटाच अपयशाचा बळी ठरतो. कारण उत्पादन काढणे, खर्च करणे, निसर्गापासून पिकाचे रक्षण करणे आणि मालाची विक्री करणे या सर्व बाबी शेतकऱ्यांनाच कराव्या लागतात. अनेक ठिकाणी चढ-उतार असतो. अनिश्चितता असते आणि त्याची सर्वस्वी जबाबदारी शेतकऱ्यांवर असते. कंत्राटी शेतीमध्ये बऱ्याच ठिकाणी विविध यंत्रणा म्हणजे उत्पादन करून घेणारी संस्था, वित्त संस्था, निविष्ठा पुरवठा करणाऱ्या संस्था, विमा कंपन्या तसेच तंत्रज्ञान पुरवठा करणाऱ्या संस्था या प्रत्यक्ष- अप्रत्यक्ष स्वरुपात सामील असतात. 'एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' या उक्तीप्रमाणे सर्वांनी विचार केला तर करार शेती पध्दतीला यश मिळते, अन्यथा या अशाश्वत युगामध्ये कोणतीच गोष्ट शाश्वत नाही याचा विचार अनिवार्य आहे.

## कंत्राटी शेतीची पुढील दिशा

आज कंत्राटी शेती पध्दतीबाबत चांगल्याबरोबर वाईटही बोलले जाते. ज्यांनी या शेती पध्दतीत भाग घेतला आहे त्यांना शाश्वती वाटते ती हमखास भावाची आणि हमखास उत्पादन विकले जाण्याची. कंत्राटी शेती ही अनेक टप्प्यांमध्ये विभागली जाण्याची गरज आहे. गावपातळीपासून ते देशपातळीपर्यंत एक व्यवस्थित शृंखला होण्याची गरज आहे. तसेच तांत्रिक सल्ला, योग्य मार्गदर्शन आणि गरजेनुसार सेवा सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज आहे. समजा करार शेती पध्दतीमध्ये एखाद्या जमिनीत विशिष्ट पिकाचे उत्पादन घ्यायचे आहे. मग त्या जमिनीत ते पीक घेतले जात असेल तर तेथे विकत घेणाऱ्या संस्थेला आवश्यक गुणप्रतीचा माल उत्पादित- उपलब्ध होऊ शकतो काय, याबाबत मार्गदर्शनाची गरज आहे. अनेकदा असे होते की ठरावीक भागात उत्पादन केलेल्या शेतीमालाला ती प्रत मिळत नाही. उदा. नाशिकच्या द्राक्षांपासून तयार होईल त्याच प्रतीची वाईन अहमदनगर जिल्ह्यातील द्राक्षांपासून होईलच असे सांगता येत नाही. पुणे जिल्ह्यातील बटाट्यापासून बनविलेल्या चिप्सची प्रत आणि अहमदनगर जिल्ह्यातील बटाट्याच्या चिप्सची प्रत सारखीच असेल असेही म्हणता येणार नाही. यासाठी योग्य असे तंत्रज्ञान आणि माहिती शेतकऱ्यांना उपलब्ध होण्याची गरज आहे. जेथे कृषी निर्यात क्षेत्र तयार होत आहे अशा भागात निर्यातीसाठी निवडलेल्या पिकांबरोबरच कंत्राटी शेतीसाठीही काही पिकांची निवड केली तर त्याचा फायदा शेतकऱ्यांना होऊ शकतो.कृषी पदवीधर तसेच इतर पदवीधरांनी करार शेती पध्दतीमध्ये जास्तीत जास्त सहभाग घेऊन उत्पादन काढणे, तंत्रज्ञान प्रसाराच्या कार्यात सहभागी होणे, निविष्ठा पुरवठा, सोयी-सुविधांची उपलब्धता यासारख्या विविध बाबींतून रोजगार निर्मिती होईल. आजही करार शेती पध्दतीमध्ये काही ठरावीक पिकांचाच समावेश आहे. परंतु त्याची व्याप्ती प्रत्येक पिकामध्ये होण्याची गरज आहे. त्यासाठी प्रत्येक पिकाच्या गुणप्रतीबाबत माहिती देण्याची गरज आहे. तसेच त्या पिकाचे मार्केट वाढविण्यासाठी प्रसार आणि प्रचार करण्याची गरज आहे. उदा. हुलग्यासारखे मौल्यवान कडधान्य आज नामशेष होऊ पाहत आहे. या पिकाबाबत मोठ्या प्रमाणात प्रबोधन केले तर त्याचा उत्पादकांबरोबरच ग्राहकांनाही फायदा होणार आहे. काळ्या कुसळ्या जातीचा गहू, बन्सी गहू, काही स्थानिक वाणांचे कडधान्य यासारख्या अनेक बाबींवर लक्ष केंद्रित केले तर बागायती क्षेत्राबरोबरच जिरायत भागातील शेतकऱ्यांचाही याद्वारे फायदा होऊ शकतो.

## ...तरच रोपट्याचा होईल वटवृक्ष!

कंत्राटी किंवा करार शेती पध्दतीचे रोपटे वाढू लागले आहे. या रोपट्याची यामध्ये सहभागी असणाऱ्या सर्वांनी मनापासून काळजी घेतली तर निश्चितच त्याचे वटवृक्षामध्ये रुपांतर होईल. या पध्दतीनेच भारतासारख्या खंडप्राय देशातील शेती व्यवसाय परदेशी आयात- निर्यात होणाऱ्या शेतीमालाच्या माध्यमातून टिकू शकेल. संघटित प्रयत्न नेहमीच यश देतात, अर्थात त्यासाठी स्वार्थ- परमार्थाची योग्य सांगड घालता येणे मात्र आवश्यक आहे. ■

हे मासिक मालक, मुद्रक, प्रकाशक संजय भास्कर पवार यांनी निर्मल ऑफसेट प्रा.लि., बी २७, एम.आय.डी.सी. माळेगाव, ता. सिन्नर, जि. नाशिक येथे छापून ४, मिथिला अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्राजवळ, दातेनगर, गंगापूर रोड, नाशिक- ४२२०१३ येथे प्रकाशित केले.

संपादक : डॉ. भास्कर गायकवाड

* या अंकातील लेखांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.